**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

**प्रेसनोट** **दिनांक – १५/०९/२०२४**

**दि. १४/०९/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | निगडी ४२१/२०२४ भारतीय न्याय संहीता २०२३ कलम १०९, १४०(२), ११८(१), ११५(२), ३(५) सह भारतीय हत्यार कायदा कलम ४, (२५) सह म.पो.अधि. ३७(१)(३) सह १३५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१३/०९/२०२४ रोजी दुपारी ०४-३० वा. सुमा. मी आशिर्वाद बिल्डींग, ३०४ फलॅट नं. बिल्डींग नं २१, ओटास्क्रिम, निगडी, पुणे |
| गुन्हा दाखल | :- | ता.१४/०९/२०२४ रोजी ००/१९ वा. |
| फिर्यादी | :- | आफीद आयुब हुबळीकर वय १५ वर्षे रा आर्शीवाद बिल्डींग नंबर २१ रूम नंबर ३०४ आंबेडकर वसाहत स्मशान जवळ निगडी पुणे |
| आरोपी | :- | १) अली आदम शेख, रा. ओटास्क्रिम, निगडी, पुणे. २) आरमान ऊर्फ डायमंड मुन्ना खान, रा. ओटास्क्रिम, निगडी, पुणे<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख,वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे पायी घरी जात असताना ओटास्क्रिम येथे राहणारे आरोपी मजकुर यांनी संगनमत करुन काळे रंगाचे अॅक्टीव्हा मोपेड मोटार सायकल नंबर माहित नाही यावर येवुन फिर्यादी समोर वाहन थांबवुन "तु पुर्वी आमचे ज्या लोकांबरोबर भांडणे झालेली आहेत त्या लोकांबरोबर फिरतो काय, तुला आता जिवंत सोडत नाही" असे म्हणुन फिर्यादीस जिवे मारण्याचे उद्देशाने बळजबरीने त्याचे मोटार सायकलवर दोघांचे मध्ये बसवुन आरोपी क्रं २ याचे राहते रुममध्ये घेवुन जावुन रुममध्ये बंद करुन तेथे दोघांनी त्यांचे कंबरेच्या चांबडी पट्टयाने तसेच हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन आरोपी क्रं १ याने जिवे मारण्याचे उद्देशाने फिर्यादीचे डोक्यात लोखंडी कोयत्याने मारले. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि यलमार ९४२३२३९९४३ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चिंचवड ३७३/२०२४ भारतीयन्याय संहिता कलम ३०९(४), ३(५) प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१३/०९/२०२४ रोजी रात्रौ २२/१५ वाजणेचे सुमारास प्राधिकरणाचे म्हाडा बिल्डिंगसमोरील सर्विस रोडवर, वाल्हेकरवाडी,चिंचवड, पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.१४/०९/२०२४ रोजी०८/०८वा |
| फिर्यादी | :- | महीला फिर्यादी |
| आरोपी | :- | दुचाकी वरील दोन अज्ञात इसम |
| तपशिल | :- | वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी या रात्री १०:१५ वाजणेचे सुमारास प्राधिकरणाचे म्हाडा बिल्डींग कडुन चिंतामणी चौकाकडे येणा-या सर्विस रोडने मोबाईलवर बोलत व वॉकिंग करत प्राधिकरणाचे म्हाडा बिल्डिंग समोर आले असता पाठीमागुन दुचाकीवर आलेल्या व काळे जर्किन तसेच काळे हेल्मेट घातलेल्या दुचाकी वरील दोन अज्ञात इसमांनी फिर्यादीचे गळयातील १,५०,०००/- रु की चे २५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनी गंठण बळजबरीने हिसकावुन घेवुन त्यांचेकडे असलेल्या दुचाकीवरुन वेगाने पळुन गेले. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि दुधे ८२०८२१३७८३ |

०३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | आळंदी २७५/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ११७(२) प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि १४/०९/२०२४ रोजी दुपारी ०३/०० वा आंबेडकर चौक,बुध्द पुतळया जवळ,चिंबळी,ता.खेड,जि.पुणे राहते |

घरी

| | | |
|---|---|---|
| गुन्हा दाखल | :- | दि.१४/०९/२०२४ रोजी २२/४३ वा |
| फिर्यादी | :- | संजु सुरज पासवान,वय-३५ वर्ष,व्यवसाय-कंपनी येथे मजुरी,रा.आंबेडकर चौक,बुध्द पुतळयाजवळ,चिंबळी,ता.खेड,जि.पुणे |
| आरोपी | :- | सुरज हिरालाल पासवान वय-४० वर्षे,रा.आंबेडकर चौक,बुध्द पुतळया जवळ,चिंबळी,ता.खेड ,जि.पुणे<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचे पती व मुलाचे चालु असलेले भांडणे फिर्यादी सोडवण्यासाठी गेले म्हणुन त्याचा मनात राग धरून फिर्यादी यांचे उजव्या हाताचे चौथे बोट नखाच्या वर मांसासहीत फिर्यादी यांचे पती सुरज हिरालाल पासवान याने त्याच्या दाताने तोडुन रथक्तबंबाळ केले व फिर्यादी यांचा बोटचा शेंडा हा तुटुन बाजुला निघाला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि साळी ९४०५४०४३४४ |

०४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | तळेगाव एमआयडीसी १९५/२०२४ भारतीय न्याय संहीता २०२३ कलम २८१, १२५(अ)(ब)मोटार वाहन अधिनियम कलम १८४/१७७ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१३/०९/२०२४ रोजी ०६/४५ वाचे सुमा. इंदोरी मार्केट इंदोरी ता.मावळ जि. पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.१४/०९/२०२४ वेळ १२/०४वा. |
| फिर्यादी | :- | मुकेश तात्याबा चव्हाण वय-५२वर्षे धंदा-नोकरी रा. साईनगर इंदोरी ता.मावळ जि.पुणे |
| आरोपी | :- | हिरो होन्डा स्प्लेंडर मोटार सायकलनंएम एच १७ बी सी ०१०६ वरील अज्ञातचालक |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे भाजीपाला आणणेकरीता इंदोरी मार्केट येथे पायी जात असताना मोटार सायकल नं एम एच १७ बी सी ०१०६ वरील अज्ञात मोटारसायकल स्वाराने त्याचे ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगात चालवुन फिर्यादीचे अपघातास कारणीभुत ठरला आहे. आणि फिर्यादीला जखमी करुन गंभीर दुखापतीस कारणीभुत ठरला आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा/८६७ भोजणे ९६८९००२८६८ |

०५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | रावेत ३६६/२०२४ भारतीय हत्यार कायदा कलम ३(२५), महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९४९ चे कलम १४२, ३७(१)(३), १३५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. १३/०९/२०२४ रोजी २३.२५ वाजता<br>जाधववस्ती येथील गणेश सृष्टी सोसयटीकडे जाणारे रोडवर असलेल्या इको पार्क नावाचे बांधकाम चालु असलेल्या इमारतीचे समोर संरक्षण भिंतीचे समोर रस्त्याचे कडेला |
| गुन्हा दाखल | :- | दि. १४/०९/२०२४ रोजी ०४.५७ वा |
| फिर्यादी | :- | गोविंद देवराव डोके, वय ३३ वर्षे, पोलीस शिपाई २१३६, नेमणुक अंमली पदार्थ विरोधी पथक गुन्हे शाखा पिं.चिं |
| आरोपी | :- | अनिरुध्द उर्फ विकी उर्फ बाळा राजु जाधव, वय २७ वर्षे, रा रावेत गाव, जाधववस्ती, डी मार्ट चे मागे, रावेत, पुणे<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने बेकायदेशीर व अनाधिकारने त्याचे ताब्यामध्ये एकुण ५१,०००/- रुपये किंमतीचे देशी बनावटीचे पिस्टल मॅगझीनसह व ०१ जिवंत काडतुस (राऊंड) बाळगताना मिळुन आला असुन त्याने मा. पोलीस आयुक्त साो, पिंपरी चिचवड यांनी दि. ०३/०९/२०२४ रोजी ००.०१ वा ते दि. १६/०९/२०२४ रोजी २४.०० वा पर्यंत पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे परिक्षेत्रात घातक शस्त्रे/अग्नीशस्त्रे बाळगण्यास मनाई आदेश असताना, सदर आदेशाचा भंग करुन तसेच मा. पोलीस उप आयुक्त परि १ पिंपरी चिंचवड, पोलीस आयुक्तालय यांनी तडीपार आदेश क्रमांक २३/२०२३ दिनांक ०१/०९/२०२३ अन्वये नमुद आरोपी यास पुणे शहर, पिंपरी चिंचवड व पुणे जिल्हातुन ०२ वर्षांकरीता हद्दपार केलेल्या आदेशाचा भंग केला आहे. म्हणुन |

त.अधिकारी/अंमलदार :- राहुल खिळे पोलीस उपनिरीक्षक ९०२१४२७४६४

०६.

पोस्टे व गु रजि.नं. :- वाकड १००८/२०२४ भारताचा शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३,२५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१) सह १३५

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१४/०९/२०२४ रोजी १९.४० वा.चे सुमारास तापकीर मळा चौकाजवळ, काळेवाडी पुणे

गुन्हा दाखल :- दि.१४/०९/२०२४ रोजी २३/४६ वा

फिर्यादी :- रामचंद्र मारुती तळपे पोलीस नाईक बनं.१२९१ नेमणुक वाकड पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

आरोपी :- विजय राहुल तलवारे वय २२ वर्षे रा. सार्थक बलकवडे यांची खोली, मोरया कॉलनी, तापकीर चौक, काळेवाडी पुणे
आरोपी अटक आहे

तपशिल :- वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी हा त्याचे कब्जात बेकायदा बिगर परवाना ०१ रिव्हॉल्व्हर व ०१ जिवंत काडतुस हे अग्निशस्त्र त्यावर केंद्र शासनाने ठरविल्या प्रमाणे बनविणाराचे नाव, निर्माणकाचा क्रमांक व अन्य ओळख चिन्हे नसलेले सदरचे पिस्तूल आपले कब्जात बाळगले असताना मिळुन आला. तसेच मा. पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड यांचे आदेशान्वये, पोलीस आयुक्तलया मध्ये दिनांक ०३/०९/२०२४ रोजी ००:०१ वा.पासुन ते दिनांक १६/०९/२०२४ रोजी २४:०० वा. पर्यंत दगड अथवा शस्त्रे, अस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, लाठी, बंदुका किंवा शारीरीक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तु बरोबर नेणे अथवा बाळगणे बाबत मनाई आदेश असताना, सदर आदेशाचा भंग केला म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि चव्हाण ९५४५४८६०२८